● मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ११९ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेस्नहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मनपाकडून घर घर संविधान मोहिम

### शहरभरात ६० हजार उद्देशिका देणार भेट



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व नगर विकास विभागाच्या परिपत्रकान्वये भारतीय संविधानाला ७५ वर्षे पुर्ण झाल्याच्या निमित्ताने अमृत महोत्सव म्हणून सन २०२४-२५ वर्ष घर घर संविधान म्हणून साजरा करण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून जालना शहर महानगर पालिकेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना संविधान उद्देशिकाची फोटो फ्रेम भेट दिली आहे. मनपाच्यावतीने शहर भरात ६० हजार उद्देशिका भेट देण्यात येणार आहे.

घर घर संविधान कार्यक्रमाच्या माध्यमातून शहरातील सर्व कुटुंबांना संविधान उद्देशिका भेट देण्यात येणार आहे. यात शहरातील सर्व शासकीय कार्यालय, सर्व सामाजिक संघटनेची कार्यालय, सर्व राजकीय पक्षाची कार्यालय यांनाही संविधान उद्देशिका भेट म्हणून महापालिकेच्या वतीने देण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेने ६० हजार संविधान उद्देशिका छापल्या आहेत.

सदर कार्यक्रमाची सुरुवात जिल्हाधिकारी जालना यांना संविधान उद्देशिकाची फोटो फ्रेम भेट देऊन करण्यात आली. त्याचप्रमाणे इतर शासकीय कार्यालयात देखील आज संविधान उद्देशिका भेट देण्यात आल्या. महानगरपालिकेच्या १४० आशा सेविका मार्फत देखील प्रत्येक कुटुंबाला पुढील दोन-तीन दिवसात संविधान उद्देशिका भेट म्हणून देण्यात येणार आहेत. सर्व नागरिकांनी आपापल्या घरात संविधान उद्देशिका लावून त्याचे नियमित वाचन करण्याचे आवाहन मनपा कडून करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांना संविधान उद्देशिका भेट देण्यात आली यावेळी आयुक्त संतोष खांडेकर, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव, सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण यांच्यासह इतर अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## मंत्रिमंडळाचा फॉम्युला ठरला! मुख्यमंत्र्यांवर सस्पेंस कायम

# अर्जुनराव खोतकरांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता; लोणीकर कि दानवे भाजपाकडून मंत्रिपदाची कुणाला संधी?

**दीपक शेळके**

**जालना -** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल शनिवार (दि २३) रोजी जाहीर झाले या निकालांत महायुतीला दोन तृतीयांश पेक्षा जास्त बहुमत मिळाले आहे. महायुतीने महायुतीने २८८ पैकी २३० जागा जिंकल्या. भाजपने १४९ जागांवर निवडणूक लढवली आणि १३२ जागा जिंकल्या. तर शिवसेनेला ५७ तर राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या आहेत. दरम्यान, महाराष्ट्रातील मंत्रिमंडळाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाले असल्याचे विश्वसनीय सुत्रांकडुन कळाले आहे.

सूत्रांवर विश्वास ठेवायचा झाल्यास, भाजपचे २०-२२ आमदार मंत्री होऊ शकतात, तर शिवसेनेचे १०-१२ आमदार आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे ८-१० आमदार मंत्री होऊ शकतात. कोणत्याही परिस्थितीत मंगळवार (दि २६) रोजी महाराष्ट्रात सरकार स्थापन करायचे आहे. मोदी सरकारला राज्यात कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रपती राजवट लागू करायची नाही. गृहखाते देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच राहू शकते, तर अर्थखाते अजित पवार यांच्याकडे आणि नगरविकास मंत्रालय एकनाथ शिंदे यांच्याकडे जाऊ शकते. मात्र, मुख्यमंत्री कोण होणार? याबाबत सस्पेंस अजूनही कायम आहे. जालना जिल्ह्यातील जालना विधानसभा मतदार संघाचे शिवसेनेचे विजयी उमेदवार माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांना या मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता आहे. प्रचारादरम्यान एकनाथ शिंदे जालना दौऱ्यावर असतांना त्यांनी जनतेला तसा शब्दही दिला होता. खोतकर यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने मुंबईला बोलावले असल्याने त्यांना मंत्रिपद मिळणार असल्याच्या शक्यता वाढल्या आहेत.

भाजपाचे भोकरदन मतदार संघाचे आ. संतोष दानवे हे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे पुत्र असून रावसाहेब दानवे विधानसभा निवडणुकीचे प्रचार प्रमुख होते. त्यांच्या नेतृत्त्वात राज्यात भाजपाने मोठे यश मिळविले आहे. त्याच बरोबर संतोष दानवे हे तिसऱ्यांना भोकरदन मतदार संघातून निवडुन आलेले आहेत. यापुर्वी रावसाहेब दानवे यांच्याकडे केंद्रीय राज्यमंत्री पद असल्यामुळे त्यांच्या मुलाला मंत्रिपदाची संधी मिळाली नाही. यंदा परिस्थिती वेगळी असल्याने भाजपाकडून संतोष दानवे यांना मंत्रिपदाची लॉटरी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



अर्जुनराव खोतकर



बबनराव लोणीकर



संतोष दानवे

परतूर मतदार संघाचे नेतृत्त्व करत असलेले माजी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी ही आपला गड कायम राखला आहे. आ. लोणीकर हे देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे व त्याच्या विश्वासातील असल्यामुळे त्यांना ही मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्रि असतांना बबनराव लोणीकर यांनी हागणदारी मुक्त महाराष्ट्र मिशन राबविले होते. त्याच बरोबर मराठवाडा वॉटर ग्रीड या देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची संपुर्ण धुरा बबनराव लोणीकर यांच्या खांद्यावर होती. या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील पाणी प्रश्न बऱ्याचअंशी दूर झाल्याचे चित्र आहे. या सर्व बाबी लोणीकरांसाठी जमेच्या बाजु ठरणार आहे. असे असले तरी भाजपाकडून जालना जिल्ह्यात केवळ एकच मंत्रिपद दिले जाणार असल्याची चर्चा असल्याने नेमके आ. संतोष दानवे कि बबनराव लोणीकर हे लवकरच स्पष्ट होणार आहे. दुसरीकडे एकास मंत्रिपद व दुसऱ्यास राज्यमंत्री पद दिले जाण्याची शक्यताही वर्तविली जात आहे.

युवा आदर्श

लक्ष्मण रेखा ...

अनुभव दे निवडणूका
धडा निमीत्ताने शिका
जनसेवेच्या आनंदापुढे
विजयाचा पेढा फिका
करत असताना टिका
रे आखा लक्ष्मण रेखा
मोकळेपणे स्विकारा
पदरातपडलेले जे का
जाणीव दिली जनतेने
कर्तव्या सोबत हक्का
अभिनंदन हो जेत्यांचे
कपाळे लावावा टिका
विजयश्री मिळे जेंव्हा
मन मयूर करतो केका
मलाचं मिळावी सत्ता
कधी तरी सोडा हेका
आपले कुटुंबात सत्ता
सोडायचा हेकट ठेका
उचित उमेदवारां कधी
नक्कीचं मिळो मोका
दुज्यांच्या सुखातसुख
आनंदनसे या सारखा
दुज्यांच्या दुःखा दुःख
आपला होणारं परका

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा

## गांधी चमन-रेल्वे स्टेशन रोडवरील रखडलेले डिव्हायडरचे काम तात्काळ पूर्ण करा अन्यथा आंदोलन

### मनसेचे राहुल रत्नपारखे यांचा ईशारा



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील गांधी चमन ते रेल्वे स्टेशन मार्गावर रस्त्याचे दुतर्फा नवीन काम पूर्ण झालेले असून रस्त्याच्या मधोमध डिव्हायडरचे काम कित्येक दिवसांपासून रखडलेले आहे. परिणामी रात्री-अपरात्री या मार्गावरून मार्गक्रमण करणाऱ्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या मार्गावरील डिव्हायडरचे काम तात्काळ सुरु करण्यात यावे अन्यथा जन आंदोलन करण्याचा ईशारा मनसेचे शहराध्यश राहुल रत्नपारखे यांनी माध्यमांशी बोलतांना दिला आहे.

गांधीचमन ते रेल्वे स्टेशन रस्त्याचे काम केल्यानंतर गेली चार-सहा महिन्यांपासून मध्ये डिव्हायडरचे काम अर्धवट राहिलेले आहे. मध्यमंत्री निवडणुका असल्यामुळे आचारसंहितेचे कारण पुढे करुन कामे केली गेली नाही. आता उद्या आचारसंहिता संपणार आहे. त्यामुळे या डिव्हायडरचे काम तात्काळ सुरु करावे अशी मागणी करण्यात आली आहे. त्याच बरोबर या रस्त्याच्या मधोमध इलेक्ट्रीक पोल आलेले आहेत. या पोलमुळे येथे छोटे मोठे अपघात होत आहेत. या अपघातात मनुष्य हानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष्य देऊन रस्त्याच्या मधोमध आलेले वीजेचे खांबही रस्त्यावरून काढून घ्यावे. गांधी चमन भागात स्त्री रुग्णालय आहे. त्याचबरोबर महानगर पलिका व रेल्वे स्टेशनकडे जाणारा मुख्य रस्ताही आहे. त्यामुळे या रस्त्यावर नेहेमीच वर्दळ राहते.

अर्धवट राहिलेले काम त्वरीत पुर्ण करण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्याचा ईशारा राहुल रत्नपारखे यांनी दिला आहे.

# लाडक्या बहिणींची संख्या घटली

### केवळ सात टक्के महिला विधानसभेत!

**मुंबई -** विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले, महायुतीकडून निवडणूक लढणारे हौसे, नवसे, गौवसे, मंत्र्यांच्या मागे धावणारे त्यांचे स्वीय सहायक, सर्वच निवडून आले. अन् हा सर्व चमत्कार 'लाडकी बहीण ' योजनेमुळे झाला, असे दावेही केले जाऊ लागले. एकीकडे लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळालेला असताना दुसरीकडे महिला उमेदवारांनाच नाकारल्याचं चित्र आहे. यंदा विधानसभा निवडणुकीत एकूण ४ हजार १३६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यापैकी २५०च्या जवळपास महिला उमेदवार होत्या. म्हणजेच एकूण उमेदवाराच्या सहा ते सात टक्केच महिलांना संधी मिळाली. आता निवडून आलेल्या महिला उमेदवारांची संख्याही ७ टक्क्यांच्या घरातच आहे.

२३ नोव्हेंबरला झालेल्या मतमोजणीत २५० पैकी फक्त २१ महिला उमेदवार विजयी ठरल्या. यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वाधिक महिला आहेत. भाजपाच्या १४ महिला उमेदवार जिंकून आल्या असून यामध्ये १० उमेदवारांचा पुन्हा विजय झाला आहे. यामध्ये चिखलीतील श्वेता महाले, जिंतूरमधून मेघना बोर्डिकर, नाशिक मध्यमधून देवयानी फरांदे, नाशिक पश्चिममधून सीमा हिरे, बेलापूरमधून मंदा म्हात्रे, दहीसरमधून मनीषा चौधरी, गोरेगाव येथून विद्या ठाकूर, पर्वतीमधून माधुरी मिसाळ, शेवगावमधून मोनिका राजळे आणि कैजमधून नमिता मुदंडा यांचा समावेश आहे. भोकरमधील श्रीजया चव्हाण, कल्याण पूर्वमधून सुलभा गायकवाड, वसईममधून स्नेहा पंडित, फुलांब्रीमधून अनुराधा चव्हाण या नव्या महिला उमेदवारांनीही यंदा दणदणीत विजय मिळवला.

साक्रीतून मंजुळा गावित, कन्नडमधून संजना जाधव या शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्या पक्षातून निवडून आल्या. तर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार) सुलभा खोडके (अमरावती), सरोज अहिरे (देवळाली) आणि अनुशक्तीनगरमधून सना मलिक तर, श्रीवर्धमधून आदिती तटकरे यांचा विजय झालाय. तर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने १० महिला उमेदवारांना निवडणूक लढवण्याची संधी दिली होती. परंतु, त्यातील एकही महिला उमेदवाराचा विजय झाला नाही.

सध्या विधानसभेत श्वेता महाले चिखली, मेघना बोर्डीकार जिंतूर, देवयानी फरांडे नाशिक मध्य, सीमा हिरय नाशिक पश्चिम, मंदा म्हात्रे बेलापूर, मनीषा चौधरी दहिसर, विद्या ठाकूर गोरेगाव, माधुरी मिसळ पार्वती, मोनिका राजाळे शेवगाव, नमिता मुदंडा केज , श्रीजया चव्हाण भोकरी, सुलभा गायकवाड कल्याण पूर्व, स्नेहा पंडित वसई,

**पान २ वर**

# लोकनेत्या दलीतमित्र सावित्रीबाई पगारे पंचतत्वात विलीन

**जालना । प्रतिनिधी -** शहर बेघर झोपडपट्टी युनीयनच्या अध्यक्षा, दलीतमित्र, माजी उपनगराध्यक्ष सावित्रीबाई सांडुजी पगारे यांचे रविवार (दि २४) रोजी सकाळी ५ वाजेदरम्यान निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. विधानसभेत काँग्रेसचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांचे त्या खंदे समर्थक होत्या. या विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी त्या सेंट मेरी शाळेत जवळ बाहेर उभ्या होत्या परीसरात गर्दी वाढल्याने अचानक पोलीस आले गर्दीत उभे असलेल्या लोकं त्यामुळे सैरावैरा पळू लागले. त्यातच तीन चार जणं हे पगारे बाई यांच्या अंगावर पडले. त्यात तीन महिला जखमी झाल्या होत्या. पडल्यामुळे पगारेबाई यांना गिरीराज हॉस्पीटलमध्ये दाखल केले. तेथे त्यांचे ऑपरेशन करुन रॉड बसविण्यात आले होते. घरी आल्यानंतर शनिवार (दि २३) रोजी रात्री उशिराने अचानक त्यांची प्रकृती खालावली. व त्यांचे निधन झाले.

सावित्रीबाई पगारे यांनी लोकनेता बलिराम यादव यांच्या सारथी बनून १९७० पासुन कन्हैयानगर निर्माण कार्य करत राजकारण प्रवेश केला होता. शहरातील झोपडपट्टयांचे निर्माते लोकनेता बलिराम यादव यांच्यासह दलीत मित्र सावीत्रीबाई पगारे ह्या देखील झोपडपट्ट्या वसविण्यात सहभागी झाल्या होत्या. तीन वेळा त्या नगरसेविका राहिल्या आहेत. पहिल्यांदाच माणीकचंद बोथरा नगराध्यक्षा असतांनाच नगर पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी धुरा त्यांनी सांभाळलेली आहे. त्यावेळी त्यांनी शहरातील चौदा झोपडपट्टयांना दलीतवस्त्या म्हणून मंजुरी दिली होती. सर्व झोपडपट्टयांना मालकी हक्क मिळवून पिआर कार्ड देण्याची मागणी त्यांनी केली होती. मात्र, अद्यापही झोपडपट्टीवासियांना पीआर कार्ड मिळाले नाही.


माजी आमदार कैलास गोरंट्याल अक्षय गोरंट्याल, विनोद रत्नपारखी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. पगारेबाई यांना अंतीम निरोप रामतीर्थ स्मशानभूमी येथे देण्यात आले. यावेळी कन्हैयानगरची आई सावित्रीबाई यांना श्रध्दांजली पर शहरबेघर झोपड़पट्टी युनीयनचे सचीव अभयकुमार यादव यांनी सर्व झोपड़पट्टी वासीयांना पिआर कार्ड मिळवुन देण्यासाठी हायकोर्टत याचीका दाखल करुन पीआर कार्ड मिळवून देऊन त्यांची इच्छा पूर्ण करू म्हणत त्यांना श्रद्धांजलि अर्पित केली. यावेळी उबाठा शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भास्कर अंबेकर यांनी त्यांच्या समाजसेवेची माहिती दिली. के सी साळवे, शिवाजी दाभाडे, राजेश राऊत, राजेंद्र राख, प्रमोद रत्नपारखे आदींनी यांनी पगारेआई यांच्या समाज कार्यावर प्रकाश टाकुन श्रध्दांजली अर्पण करुन निरोप दिला. यावेळी विनोद यादव, बाला परदेशी, अमर डांगे, विजय हजारी, संतोष लोखंडे, बापु साळवे, अ‍ॅड राहुल इंगोले, बाबु भवर, लक्ष्मण क्षीरसागर, रामेश्वर निकस, जितेंद्र दाभाडे, विनोद दांडगे, गोपाल खवले, दीपक राठोड, मनोज यादव, भग्गु भगत, योगेश भगत, लोखंडे पहेलवान, प्रितेश यादव, सय्यद अजझर, शेख कलीम, राम घोडके यांच्यासह महिला पुरुषांची उपस्थितीत सावित्रीबाई पगारे यांना अंतिम निरोप देण्यात आला.



# संपादकीय पान

## अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय...

अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय या तीन शब्दात पंधराव्या विधानसभेच्या निकालाचे वर्णन करावे लागेल. अभूतपूर्व म्हणजे या पूर्वी कधीही घडले नाही असे. हो हा निकाल अभूतपूर्व असाच आहे कारण यापूर्वी असा निकाल महाराष्ट्राने कधीही पाहिला नव्हता. २०१४ च्या मोदी लाटेतही जे घडले नव्हते ते आता घडले. महायुतीने तब्बल दोनशे छत्तीस जागा जिंकत महाविकास आघाडीचा सुफडा साफ केला. महाराष्ट्रात महायुतीची लाट नव्हे तर त्सुनामी आली. या त्सुनामीत महाविकास आघाडीचे अनेक गड उध्वस्त झाले. महाविकास आघाडीच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला. ही त्सुनामी इतकी जबरदस्त होती की पाच महिन्यांपूर्वी जी महाविकास आघाडी अजिंक्य वाटत होती तिला अर्धशतक देखील गाठता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभेला विरोधीपक्ष नेता देखील मिळणार नाही अशी अवस्था झाली. हे खरोखरच अभूतपूर्व असेच आहे. अनाकलनीय या अर्थाने की असा निकाल लागेल असा अंदाज कोणालाच आला नव्हता. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील राजकीय धुरिणांना असा निकाल लागेल असे वाटले नव्हते. खुद्द भाजप आणि महायुतीच्या नेत्यांना देखील हा इतका विराट मिळेल असे वाटले नसेल. भल्या भल्यांना विचार आणि अभ्यास करायला लावणारा असा हा निकाल आहे. महायुतीला या निवडणुकीत महाविकास आघाडीपेक्षा थोड्याफार जागा अधिक मिळतील असा अंदाज होता. महायुती कसाबसा सत्तेचा सोपान चढेल असा अंदाज होता निवडणूक पूर्व चाचणीत ही तेच दाखवण्यात आले होते मात्र प्रत्यक्षात त्याहूनही खूप वेगळे घडले. अविश्वसनीय या अर्थाने की या निकालावर विश्वास ठेवणे अनेकांना अजूनही कठीण जात आहे. काहीजण या निकालावर अजूनही विश्वास ठेवायला तयार नाही कारण अवघ्या पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पूर्णपणे वेगळे चित्र पाहायला मिळाले होते. महाविकास आघाडीने आश्चर्यजनक कामगिरी करत लोकसभेच्या ३० जागा जिंकत महायुतीला नामोहरण केले होते. अवघ्या पाच महिन्यात अशी काय जादूची कांडी फिरली की ज्याने इतका मोठा उलटफेर केला ? लोकसभेप्रमाणेच विधान सभेतही महाविकास आघाडीची सरशी होईल असा कयास काहीजण लावत होते त्यामुळेच या निकालावर त्यांचा विश्वास बसत नाही अर्थात कोणाचा विश्वास बसो अगर न बसो जनतेने दिलेला हा निकाल राजकीय पक्षांसह सगळ्यांना स्वीकारावाच लागणार आहे. हा जनतेच्या न्यायालयाने दिलेला निकाल आहे तो स्वीकारूनच विरोधी पक्षांनी या निकालाचे आत्मचिंतन करायला हवे. या निकालाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटी नंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणीवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीने सामूहिक प्रयत्न केला त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नेहमीप्रमाणे साथ लाभली. लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपच्या दिल्लीतील नेत्यांनी छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन प्रचाराचे अतिशय सूक्ष्म व काटेकोर नियोजन केले. याउलट माहविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला सहानुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते राहिले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. जागा वाटप असोत की प्रचार सभा महाविकास आघाडीची एकजूट कोठेच दिसली नाही. महाविकास आघाडीचे नेते सत्ता आपल्यालाच मिळाली या थाटात एकमेकांशी भांडू लागले. मुख्यमंत्रीपदावरून महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरू झाली. महाविकास आघाडीतील बाष्कळ नेत्यांनी जी बोल बच्चनगिरी केली ती ही त्यांना नडली. लोकसभा निवडणुकीत झालेली पिछेहाटी नंतर महायुती खडबडून जागी झाली आणि महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक योजना. या योजनेअंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. ही योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. ज्या वेळी ही योजना आली त्यावेळी विरोधी पक्षांनी या योजनेवर टीका केली ही टीका कदाचित महिला मतदारांना रुचली नसावी. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश. या निकालाने कॉंगेस, शरद पवारांची राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तिन्ही पक्षांना मतदारांनी नाकारून भाजप, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर विश्वास दाखवला आहे त्यामुळे या तिन्ही पक्षांना आता पुन्हा शून्यातून सुरुवात करावी लागेल. अर्थात एका पराभवाने कोणताही पक्ष संपत नसतो झालेल्या चुका दुरुस्त करून या पक्षाने २०२९ चे लक्ष समोर ठेवून पक्षाची बांधणी करावी लागेल. पक्षातील जुन्या बोल बच्चन नेत्यांना बाजूला सारून नव्या दमाचे कार्यकर्ते तयार करावे लागतील. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत त्यावर लक्ष केंद्रित करून या पक्षांनी तयारी सुरू करावी तर महायुतीने जनतेने दिलेल्या अभूतपूर्व यशाचा आदर राखत जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करून महाराष्ट्राला देशातील नंबर १ चे राज्य बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# हा तर हिंदूंच्या संघटित शक्तीचा विजय...

## हिंदूंनी एक बोट दाबलं, तर सरकार आलं; वज्रमूठ केली तर हिंदु राष्ट्र निश्चित! - हिंदु जनजागृती समिती

लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी झालेली चूक सुधारून हिंदूंनी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी मोठ्या संख्येने घराबाहेर पडत मतदान केले. परिणामी राज्यात पुन्हा हिंदुत्ववादी सरकार सत्तास्थापन करत आहे. हा 'व्होट जिहाद'चा पराभव असून हिंदूंच्या संघटित शक्तीचाच विजय आहे, हेच दिसून येत आहे. आज हिंदूंनी एक बोट दाबलं, तर सरकार आलं आहे. जर हिंदूंनी मिळून वज्रमूठ केली, तर हिंदु राष्ट्र का येणार नाही? निश्चितच हिंदु राष्ट्र येईल, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीने केले आहे.

ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते मौलाना सज्जाद नोमानी यांनी १७ कलमी मागणीपत्र महाविकास आघाडी सरकारला दिले होते आणि कॉंग्रेसने त्यांचे ते पत्र स्वीकारल्याने सर्व मुसलमानांनी महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन नोमानी यांनी केले होते. या १७ मागण्यांमधील एक मागणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी आणण्यासारख्या हिंदुविरोधी मागण्या होत्या. महाराष्ट्रात जर हिंदूंच्या सुरक्षेवर आघात होणार असेल, तर तो आघात हिंदूंनी मतपेटीच्या माध्यमातून उलथावून लावला आहे. देशात आणि राज्यात हिंदूंच्या सुरक्षेसाठी हिंदू हिताचे सरकार हिंदूंनी निवडून दिले आहे, असे लक्षात येते.



महाराष्ट्रात सुराज्य आणण्यासाठी संस्कृतीनिष्ठ, सुरक्षितता आणि समृद्धी यांना प्राधान्य देणार्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन समितीने 'सुराज्य अभियाना'द्वारे केले होते. अनेक हिंदु संघटनांनी मतदान जागृती मोहिमा राबवल्या होत्या. परिणामी हिंदु मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडला, मतदानाची टक्केवारीही वाढली आणि राज्यात हिंदुत्वनिष्ठ अन् राष्ट्रनिष्ठ विचारांचे सरकार बहुमताने येत आहे. यासाठी अनेक साधू-संत, हिंदुत्वनिष्ठ संघटना, आध्यात्मिक संस्था, सामाजिक संस्था आणि राष्ट्रप्रेमी नागरिक यांनी संघटितपणे मेहनत घेत जागृती केली होती. त्यामुळे हा हिंदूंच्या संघटित शक्ती विजय आहे. या विजयाबद्दल आम्ही आगामी हिंदुत्ववादी सरकारचे अभिनंदन करत आहोत, असेही समितीने म्हटले आहे.

# संविधान; मूलभूत अधिकार, कर्तव्य अन् मार्गदर्शक तत्वे

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये ज्या असंख्य स्वातंत्र्य सैनिकांनी, हुतात्म्यानी जीवाचे बलिदान केले त्या प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकांचा आपल्याला अभिमान आहे, त्या प्रत्येक स्वातंत्र्यसैनिकाच्या त्यागाला, बलिदानाला न्याय देऊन सुरक्षित केले असेल तर ते भारतीय संविधानामुळे, २६ जानेवारी १९५० ला प्रजासत्ताक दिनामुळे भारत एक राष्ट्र म्हणून उभे राहिले ते भारतीय संविधानामुळे. संविधान हे राष्ट्र निर्मितीचा, देशाच्या संपन्नतेचा व समृद्धीचा राष्ट्रीय ग्रंथ आहे.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू व इतर सन्माननीय नेत्याकडे भारताचे संविधान सुपूर्त केले व ते राष्ट्राला अर्पण करण्यात आले. त्याच दिवशी काही कलमांची अंमलबजावणी करण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० रोजी ३९५ कलमे, २२ प्रकरणे आणि आठ परिशिष्टे असलेल्या धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकास समता,स्वातंत्र्य, न्याय, बंधुतेची शिकवण देणाऱ्या भारतीय संविधानाचा अंमल सुरू झाला आणि देश सर्व प्रजेची सत्ता असणारा सार्वभौम प्रजासत्ताक भारत बनला.

भारताला मिळालेले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधान लिहिले गेले .संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान सभेतील सर्व मान्यवर सदस्य यांच्या योगदानाबद्दल त्या सर्वांना अभिवादन करण्याचा दिवस म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने२४ नोव्हेंबर २००८ रोजी शासकीय आदेश काढून सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, जिल्हा परिषद , पंचायत समित्या, महानगरपालिका , नगरपालिका, ग्रामपंचायती, प्राथमिक व माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा , महाविद्यालय इत्यादी ठिकाणी सामुदायिक संविधान प्रास्ताविका वाचन संविधान जत्रा, कलमे, पोस्टर्स,सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात यावेत असा आदेश पारित करण्यात आला.

भारत सरकारने २०१५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीच्या निमित्ताने सर्व देशभर संविधान दिन साजरा करण्यास मंजुरी दिली, आणि २६ नोव्हेंबर २०१५ रोजी पहिला अधिकृत संविधान दिन संपूर्ण देशभर साजरा करण्यात आला, तेव्हापासून संविधान दिन प्रत्येक सरकारी कार्यालयात साजरा करणे बंधनकारक आहे.

संविधानाने माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. सामान्य माणूस संविधानापासून दूरच राहिला,स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही मोजक्याच नागरिकांना आपल्या संविधानिक अधिकाराची माहिती आहे हे देशाचे दुर्दैव आहे. संविधानाचे महत्त्व, मूलभूत अधिकार पुढच्या पिढीकडे पोहोचवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

संविधान दिनी प्रास्ताविक वाचनाचा उद्देश नागरिक व विद्यार्थ्यांना संविधानाबद्दल माहिती व्हावी आपले मूलभूत अधिकार व कर्तव्य यांची जाणीव व्हावी असा आहे, त्याचबरोबर आपल्या देशाचा राज्यकारभार कसा केला जातो, कसा करावा, याची माहिती मिळते. कार्यपालिका,मंत्रिमंडळ, न्यायपालिका, निवडणूक आयोग, मार्गदर्शक तत्वे, केंद्र राज्य संबंध, घटनादुरुस्ती इत्यादीची माहिती मिळते, त्यातूनच जबाबदार नागरिक कसे होता येईल ते समजते. संविधान म्हणजे आपली आचारसंहिता आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये सर्व संविधानाचे मूल्य आहे, तो संविधानाचा पाया आहे, म्हणूनच प्रास्ताविक वाचन करणे ही प्राथमिकता आहे. शाळेमध्ये तज्ञाची व्याख्याने आयोजित करावी व संविधानाचा प्रचार आणि प्रसार व्हावा या दृष्टीने प्रयत्न करावा. शालेय जीवनापासून मुला मुलींना संविधानाची माहिती व्हावी, मुलामुलींची मने सुसंस्कारित व्हावीत. दररोजच्या वाचनामुळे प्रास्ताविकेचे पाठांतर होईल व शब्दांचा अर्थ हळूहळू समजू शकेल. संविधानाचा सन्मान म्हणजे देश सन्मान, राष्ट्रभक्ती होय.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १३ डिसेंबर १९४६ रोजी न्याय,समानता, स्वातंत्र्य हे संविधानाचे उद्देश असणारी उद्देश पत्रिका संविधान सभेला सादर केली. भारतीय संविधानाच्या ध्येय आणि उद्दिष्टांसंबंधीच्या प्रस्तावावर दिनांक १३ डिसेंबर १९४६ ते १७ डिसेंबर १९४६ या कालावधीत सविस्तर चर्चा झाली. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १७ डिसेंबर १९४६ रोजी ऐतिहासिक भाषण केले त्यात ते म्हणतात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मांडलेल्या प्रस्तावात न्याय, समानता, स्वातंत्र्य ही मूल्य आहेत, यामध्ये बंधुता हे मूल्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खास देण आहे.( द गॅझेट ऑफ इंडिया २६ फेब्रुवारी १९४८ प्रास्ताविकात बंधुता याविषयी एक विधान जोडले , पण हे विधान उद्देश पत्रिकेच्या प्रस्तावात नव्हते, समितीला असे वाटले की सध्या भारतात सद्भाव आणि बंधू भावाच्या भावनांची जेवढी आवश्यकता आहे तेवढी पूर्वी कधीही नव्हती म्हणून नवीन संविधानात हे विशेष ध्येय प्रास्ताविकात विशेष उल्लेख करून प्रकर्षाने मांडणे आवश्यक वाटले) डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात भारतात राजकीय समता आणता येईल मात्र बंधुतेचे काय ? भारतात बंधुता जोपर्यंत प्रस्थापित होत नाही तोपर्यंत संविधानातील मूल्यांना स्वीकारले असे म्हणता येत नाही.

मसुदा समितीचे सदस्य अल्लादी कृष्णस्वामी अय्यर म्हणतातसंविधानाच्या प्रास्ताविकेत भारतात भविष्यकाळात शासन कशा पद्धतीचे असेल याचा विचार केला आहे .भारताची जडणघडण उभारणी सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य या उद्देशावर करून भारतातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, स्वातंत्र्य, समानता बंधुता प्रस्थापित करण्याचा संकल्प केलेला आहे.

उद्याच्या भारताचे भविष्य शाळेतील वर्ग खोल्यांमधून घडत आहे शिक्षण व्यवस्थेचे ध्येय आणि उद्दिष्ट याबाबत शिक्षण तज्ञ हेरंब कुलकर्णी म्हणतात' राज्य व्यवस्थेने जी मूल्य अंगीकारली आहेत त्या मूल्यांचा प्रचार आणि प्रसार करणे हे शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट असावे'.

विद्यार्थ्यांमध्ये संविधानातील मूल्ये व उद्दिष्टे रुजवणे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, भाषा संस्कृती याविषयी आदर निर्माण व्हावा स्वच्छता, नियमितपणा, शिस्त यांचे महत्त्व त्यांना कळावे तसेच महिला, दिव्यांग व इतर समाजातील विशेष घटकाबद्दल त्यांची वागणूक योग्य असावी असे विविध पैलू विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे संविधानातील आदर्श प्रत्यक्ष जीवनात उतरविणे.

शालेय शिक्षणात मूलभूत हक्क आणि कर्तव्य यांचा सर्वाधिक प्रभाव आहे. अभ्यासक्रमाची मूळ प्रेरणा भारताचे संविधान आहे. इयत्ता तिसरीपासून नागरिकशास्त्र या विषयासंबंधी निगडित अभ्यास आहे, इयत्ता नववी पासून राज्यशास्त्र विषयाचा अभ्यास आहे.

शालेय पाठ्यपुस्तकात संविधानाची प्रास्ताविका सुरुवातीला छापलेली आहे. शाळेत परिपाठाच्या वेळी तिचे वाचन केले जाते. पाठ्यपुस्तकात उद्देशिकेच्यावर भारताचे संविधान असे लिहिले आहे त्यामुळे ही उद्देशिका किंवा प्रास्ताविका म्हणजेच भारताचे संविधान आहे, असाही मुलांचा आणि बऱ्याचदा थोरांचाही समज होतो तो बरोबर नाही . प्रास्ताविका ही भारतीय संविधानाची संक्षिप्त ओळख आहे. प्रास्ताविका म्हणजे संविधानाचे सारतत्व, सार, संविधानाचा चबुतरा, संविधानाचे तत्वज्ञान अशा अनेक विशेषणांनी तिचा गौरव संविधान सभेतील सदस्यांनी तसेच कायदे तज्ञांनी केला आहे.


भारतीय संविधान म्हणजे केवळ मागासवर्गीयांसाठी राखीव जागा किंवा फक्त मागासवर्गीयांसाठी सामाजिक न्याय असे जे काही जणांना वाटते ते खरे नाही. भारतीय संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे, भारतातील सर्व कायदे हे संविधानावर आधारित आहेत. नागरिकांचे मूल्य जीवन हे संविधानावर आधारित आहे. भारतीय संविधानाने भारतासारख्या विशाल देशात कायद्याचे राज्य स्थापन केले. शंभर कोटीपेक्षा जास्त जनतेला राजकीय स्थैर्य दिले. अनेक भेदभाव व विषमता असलेल्या देशाला एकता व अखंडतेचा मूलमंत्र दिला राजेशाही, साम्राज्यशाही, सरंजामशाही, पुरोहित शाही आणि चातुर्वर्ण्य यांच्या चक्रीत भरडल्या जाणा-या सर्वसामान्य जनतेला मूलभूत मानवी अधिकार यांची ओळख करुन दिली. निवडणुकीतील सहभाग व प्रौढ मतदानाचा अधिकार यांच्या योगाने सर्वसामान्य माणसांना राजकीय शक्ती प्रदान केली. राजकीय सामाजिक व धार्मिक सत्तेच्या गुलामांना नागरिकत्व बहाल केले. भारतीय संविधानाने सर्वसामान्य जनतेला निर्णयाचा सर्व अधिकार बहाल केला. शोषण करणाऱ्या मुठभर अत्याचारी जाती किंवा स्वतःला अविभाज्य मानणारा वर्ग यांचा निर्णय प्रक्रियेवरील एकाधिकार नष्ट केला. नागरिकांचे मूलभूत अधिकार, नागरिकांची कर्तव्य, मार्गदर्शक तत्वे, केंद्र सरकारचे अधिकार, राज्य सरकारचे अधिकार, राष्ट्रपतीचे स्थान अधिकार, राज्यपालाचे स्थान अधिकार, न्यायालयाच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या तरतुदी, केंद्रीय लोकसेवा आयोग, जल आयोग उर्जा आयोग त्यांची रचना, स्वरूप, कार्य. राज्याची राजभाषा, अल्पसंख्यांक जमातीचे संरक्षण, इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यासाठी विशेष तरतुदी केल्या. या विशेष तरतुदी करताना त्या पाठीमागील भूमिकेचा .. तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास करावा लागेल. या तरतुदी करताना या देशाच्या एकसंघतेचा विचार सतत मनात ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाची निर्मिती केली.

शेकडो जाती, पोट जाती ,उपजाती, जगाच्या पाठीवरचे सर्व धर्म, विविध पंथ,भाषा, संस्कृती, अनेक संस्थाने असलेला भारत देश एक राष्ट्र म्हणून उभा राहू शकत नाही असे विस्टन चर्चिलने म्हटले होते. अर्थात ही परिस्थिती कोणीही मान्य केली असती. ४ नोव्हेंबर १९४८ रोजी भारतीय संविधानाच्या आधारभूत सिद्धांताचे विवेचन करताना ब्रिटिश नोकरशहा मेटकॉफ चे उदाहरण देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात' मेटकॉफ यांनी खेड्याच्या लोकसत्ताकाची स्तुती केली असली तरी शेवटी भारताच्या विनाशास खेडीच कारणीभूत आहेत. असा सल्लाही ते देतात, ग्राम, खेडे म्हणजे काय तर टोकाच्या स्थानीय वादाचे, जातीयवादाचे डबके आहे. संविधानाच्या मूळ मसुद्यात ग्राम या एककाला तिलांजली देण्यात आली असून व्यक्तीला एकक मानण्यात आले आहे. व्यक्तीला केंद्र मानण्यात आले आहे. आम्ही भारताचे लोक, आम्ही सर्व भारतीय ही भारतीयत्वाची भावना संविधानाने जनतेत रुजवली म्हणून भारत हे राष्ट्र म्हणून उभे राहिले आहे . अनेकतेत एकता ही किमया संविधानाने केली आहे.

**भिमराव जयवंत गाडे , ९२७३५७४४३१**

# संधीसाधू, लाचारांनी महाराष्ट्र नासवला

महाराष्ट्र विधानसभेचे निकाल अनाकलनीयच नव्हे तर अचंबित करणारे आहेत.लोकसभा निवडणुकीत चारशे पार चा नारा देऊन हवेत उडणाऱ्या महायुतीला महाराष्ट्राच्या जनतेने जमिनीवर आणले.महाराष्ट्रातील जनतेची मानसिकता लक्षात येताच महायुतीने साम दाम दंड भेदाचा यथेच्य वापर करताना सत्तेचा आपल्या विधानसभा निवडणुकीत कसा फायदा उचलायचा ह्याचे गणित लक्षात घेता लाडकी बहीण योजना अमलात आणली त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला कारण,वाढती महागाई, बेरोजगारी पाहता जे मिळतंय ते स्वीकारा कारण ती काळाची गरज होती आणि जे देणार आहेत त्यांची हि योजना पुढे सतत चालू राहावी ह्यासाठी महायुतीला भरघोस मतदान केले.त्याचा फायदा महायुतीला मिळाला.महाविकास आघाडीची आर्थिक बाजू कमकुवत होती त्याच बरोबर लोकसभेला मिळालेल्या प्रतिसादाची हवा डोक्यात गेली.मुख्यमंत्री पदाच्या वादाने अंतर्गत धुसफूस सुरु झाली.लाडक्या बहिणीला वाढीव रक्कम देण्याच्या घोषणेवर महिलांनी विश्वास ठेवला नाही.महायुतीला मतदान करताना उमेदवार नव्हे तर मतदारांनी फक्त चिन्ह लक्षात ठेवले म्हणून संजय राठोड,गोपीनाथ पडळकर,राम कदम,धनंजय मुंढे,संतोष बांगर,नितेश राणे आणि असे अनके हुकमी बदनाम वाचाळ लंपट,चरित्रहीन उमेदवार निवडून आले.गुजरातच्या एका अति धनाढ्य उद्योगपतीने महाराष्ट्रात म



हायुतीचे सरकार यावे म्हणून गुजरातेतून रोख चौतीशे कोटी रक्कम असलेले कंटेनर महाराष्ट्रात आले त्याचा माणशी दोन हजार ते दहा हजार चे पाकीट वाटप,त्याच बरोबर दोन वेळ बिर्याणी दारूची सोय करून मतांची बेगमी केली अशी चर्चाही केली जात आहे.

चौतीशचे कोटी हि मोठी रक्कम अतिधनाढ्य उद्योगपतीने खैरात म्हणून नक्कीच दिली नसणार.महाराष्ट्राचा गुजरात करण्याचे,मुंबई केंद्रशासित करण्याचा डाव,महत्वाच्या मोक्याच्या जागा हडप करण्याचे कारस्थान,विरोधी पक्षांना संपवण्याची योजना,राष्ट्रीय बँकांवर वर्चस्व,अश्या अनेक गोष्टी स्वार्थ साधणाचा मनोदय असण्याची दाट शक्यता वाटते.ज्यांनी आर्थिक खैरात स्वीकारली त्यांना ती पाच वर्षे पुरणार आहे काय ?केंद्रात जसा विरोधी पक्ष नव्हता आणि केंद्र सरकारने जो हुकूमशाही मनमानी कारभार केला त्याची प्रचिती महाराष्ट्रात सुद्धा दिसू शकते.महाराष्टाची निवडणूक हि पारदर्शी झालेली नाही हे निकालावरून सिद्ध होते. बिन्नीचे धडाडीचे उमेदवार प्रशासनाला हाताशी धरून षडयंत्र करूनच पाडले अशी शंका येते.विरोधी पक्षातील निवडून आलेल्या उमेदवाराची चोहोबाजूनी कोंडी करून नामोहरम करण्याचे कारस्थान होऊ शकते.सुसंस्कृत,पुरोगामी,प्रतिष्टीत महाराष्टात इतक्या अचंबित करणारी खालच्या दर्जाची निवडणूक कधीच झाली नव्हती.ह्यावरून एकच गोष्ट सिद्ध होते महायुती जिंकली पण शिवरायांचा महाराष्ट्र हरला.

**यशवंत चव्हाण,**
**सीबीडी बेलापूर (नवी मुंबई )**

पान १ वरुन

## लाडक्या बहिणींची ...

अनुराधा चव्हाण फुलंबारी, मंजुळा गावित साक्री, संजना जाधव कन्नड, सुलभा खोदके अमरावती, सरोज आहीरे देवळाली, सना मलिक अनुषक्तीनगर, अदिती ताटकरे श्रीवर्धन, ज्योती गायकवाड धावरी या महिला विधानसभेत निवडून गेलेल्या आहेत. २०१९ मध्ये भाजपाने १२ महिला उमेदवारांना संधी दिली होती. तर, शिवसेनेने ९, कॉंग्रेसने १५ आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने ९ महिला उमेदवारांना संधी दिली होती. म्हणजेच मुख्य प्रवाहातील पक्षांनी ४५ महिला उमेदवार उभे केले होते. त्यापैकी फक्त २४ महिला उमेदवार जिंकल्या. २८८ सदस्यांच्या विधानसभेत फक्त २४ महिला आमदार म्हणजेच फक्त ८ टक्के महिला आमदार होत्या. तर यावेळी २१ महिला उमेदवार जिंकल्याने ही टक्केवारी ७ टक्क्यांवर आली आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये राज्यात ३३ टक्के महिला आरक्षणाचा ठराव पास करण्यात आला. पुढची जनगणना झाल्यानंतर ३३ टक्के आरक्षणाचे बिल अंमलात येणार आहे. तेव्हा सभागृहात २८८ पैकी ९६ महिला आमदार असणं अपेक्षित असेल. त्यामुळे सभागृहात महिला प्रतिनिधींचा आवाज वाढवण्याकरता आता २०२९ च्या निवडणुकीची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# कुंडलिक मुठ्ठे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुका प्रमुख कुंडलिक पा मुठ्ठे यांचा वाढदिवस समाजातील उपेक्षित घटक,ऊस तोड कामगार महिला व पुरुष यांना फराळासह टोपी व रुमाल साडी चोळी देऊन, लिमखेडा येथील ग्रामदैवत असलेल्या महाकाली देवीच्या मंदिरात देवीला महाविकास आघाडीचे सरकार यावे असे साकडे घालून वाढदिवस साजरा करण्यात आला. बऱ्याच वेळा अनेक नेत्यांचे वाढदिवस मोठ मोठे होल्डींग, बॅनर किंवा इतर खर्च करून साजरे केले जातात.मात्र शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या शिकवणी प्रमाणे ८० टक्के समाज कारण व २० टक्के राजकारण हे विचार पुढे नेत वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना म्हणाले की,आम्ही शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या विचारावर चालणारे शिवसैनिक आहोत,त्यामुळे असे उपक्रम फक्त शिवसेना राबवू शकते, यात कुठलाही हेतू वा स्वार्थ नसुन,फक्त समाजसेवा हा उद्देश समोर ठेवत सलग मागील तीन वर्षांपासून याच पद्धतीने वाढदिवस साजरा करत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख कुंडलिक पा मुठ्ठे, लिमखेडा बु.येथील शेतकरी गणपत भाऊराव चव्हाण,शिवसैनिक सुरेश पवार,शंकर भोपळे,सुनील भोपळे,संतोष इंगळे,समीर शहा,सुलतान कुरेशी,अमोल भोपळे यांच्यासह ऊसतोड कामगार,महिला पुरुष बाळगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेईएस महाविद्यालय येथे पर्मनंट सुरक्षा रक्षक भरतीला प्रचंड प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी -** सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा ऍक्ट २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा.लि.आणि जे. ई. एस. महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या भरतीस बेरोजगार युवकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून यामध्ये दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी परिसरातील ज्या युवकांची नोकरीसाठी निवड झाली .त्यांना जागेवरच नियुक्तीपत्र देण्यात आले .

ही भरती प्रक्रिया दि. २५ नोव्हेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत जे. ई. एस. महाविद्यालय जालना येथे सुरू राहणार आहे. जालना जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांनी या भरतीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन,



जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री,प्लेसमेंट अधिकारी तथा एनसीसी कमांडर प्रा. फुलचंद मोहिते , राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ.राजेंद्र सोनावणे तसेच भरती अधिकारी महेश सरतापे आणि संदीप राठोड यांनी केले आहे.. अधिक माहिती करिता भ्रमणध्वनी क्रमांक :९५५२२३८०५७ शी संपर्क साधावा. असे आव्हान जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी केले आहे.

# २१ व्या पशु गणनेस सुरुवात

**जालना -** केंद्र पुरस्कृत २१ वी पशु गणना दि. २५ नोव्हेंबर, २०२४ पासून सुरू होत आहे. पशुसंवर्धन विभागाकरिता अत्यंत महत्त्वाची गणना असून, या गणनेमधून प्राप्त होणारी माहिती पुढील पाच वर्ष नियोजन, धोरणात्मक निर्णय व विविध योजनांसाठी अत्यंत उपयुक्त असल्याने पशुगणना अतिशय महत्त्वाची आहे.

# भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथे आत्मानंद सरस्वती रंगनाथ महाराज यांची पुण्यतिथी व संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज यांचा समाधी सोहळा निमित्त टेंभुर्णी येथे भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील खलसे गुरुजी यांच्या मळ्यातील गणपती व रंगनाथ महाराज मंदिर परिसरात आयोजित या सप्ताहाचा शुभारंभ गुरुवारपासून करण्यात आला आहे. या सप्ताहात दररोज काकडा भजन, गणपती व रंगनाथ महाराज पूजन- आरती, विष्णुसहस्त्रनाम, रंगनाथ महाराज चरित्र पठण, गाथा भजन, श्रीमद् भागवत कथा, प्रवचन, हरिपाठ व हरिकीर्तन याप्रमाणे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भागवत कथेचे वाचन अशोक महाराज जोशी यांच्या अमृतवाणीतून केले जाणार आहे. दररोज रात्री ८ ते १० या वेळात होणाऱ्या हरिकीर्तनात सुभाष महाराज शेळके, विठ्ठल महाराज जगताप, श्रीपाद बुवा मुळे महाराज, प्रकाश महाराज तौर, भगवान महाराज गाडेकर, सदानंद महाराज क्षिरसागर, रामदास महाराज तळेकर आदिंची कीर्तन सेवा होणार आहे. सप्ताहाची सांगता २८ नोव्हेंबर रोजी रघुनाथ महाराज देशपांडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे यावेळी सायंकाळी ४ ते ७ या वेळात भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. टेंभुर्णीसह पंचक्रोशीतील भाविकांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह समितीतर्फे करण्यात आले आहे.यंदा रौप्य महोत्सव म्हणजे या कार्यक्रमाचे २५ वे वर्ष असल्यामुळे भक्तीमय चे मस्त कार्यक्रम पार पडणार आहे.



# टेंभुर्णी भाजपाकडून विजयाचा जल्लोष

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने आणि त्यांच्या सर्व सहकारी यांच्या वतीने तिसऱ्यांदा हॅट्रिक करणाऱ्या आमदार संतोष दानवे यांच्या विजयाच्या स्वागत करत मनसोक्त नाचून गाऊन

शिवाजी नगर ते सर्व गावात काढडण्यात आलेल्या रैली मध्ये मस्त जल्लोष केला. या रैली मध्ये तरुण मंडळी यांचा जास्त भरणा असून भोकरदन हून आमदार संतोष दानवे यांना शुभेच्छा देऊन तिथला विजयाचा गुलाल येथे उधळत

एन्जॉय केला. शिवाजीनगर ते मेन रोड मारवाडी गल्ली जिरी माळी गल्ली ते माळी गल्ली ते संत सावता चोक या दरम्यान ही मोठी रैली पार पडली. तरुण मंडळीचा मोठा प्रतिसाद या वेळी या रैलीला भेटला.. या रॅलीमध्ये जिल्हा परिषद सदस्य शालिग्राम पाटील म्हस्के यांच्यासाठी सर्व



कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. ही रॅली एवढी मोठी होती की संपूर्ण टेंभुर्णी गुलाल मे होऊन गेलेली होती. शिवाजीनगर भागामध्ये या रॅलीची सांगता झाली.

# संविधान दिनानिमित्त एक दिवशीय कार्यशाळा व ग्रंथ प्रकाशन सोहळा

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त सामाजिक समता संघर्ष समिती व संविधान संवाद समिती यांच्यातर्फे संविधान दिनानिमित्त एकदिवशीय संविधान कार्यशाळा व त्यानिमित्त ग्रंथ प्रकाशन सोहळा संपन्न होत आहे. वर्षभर सागर संविधानाचा या कार्यक्रमानिमित्त मागील महिन्यात संविधान समाधकासाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात येऊन प्रशिक्षित तयार करण्यात आले आहेत. याचेच औचित्य साधून २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिन आणि त्यानिमित्त ग्रंथ प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष संत कैकाडी बाबा मठाचे प्रमुख हरिभक्त परायण भारत महाराज जाधव हे असणार आहे. वारकरी विचारांची नवी मांडणी करणारा ग्रंथ होय होय वारकरी, या ग्रंथाचे प्रकाशन होणार असून या ग्रंथावर भाष्य करणारे व्याख्यान प्रसिद्ध इतिहास तज्ञ डॉक्टर रमेश बगाडे हे करणार आहेत. हरिभक्त परायण ज्ञानेश्वर बंडगर महाराज संतांचे समतेचे विचार आणि भारतीय संविधान या विषयावर व्याख्यान होणार आहे. भारत जोडो या ऐतिहासिक कात्रीचे विश्लेषण करणारा ३२ विचारवंतांचा लेखांचा संग्रह असलेला भारतीयांचा पुनःप्रत्यय संदेश भंडारे आणि राहुल पुंगलिया यांनी संपादित केलेल्या ग्रंथाचे यावेळी प्रकाशन होणार आहे. त्यावर प्रमोद जायभाय यांचे भाषण होणार आहे. कैकाडी महाराजांचे पुतणे कैकाडी महाराज मठांचे निर्माते रामदास महाराज यांच्या स्मृतिग्रंथांचे प्रकाशन यावेळी होणार आहे. या पुस्तकावर हरिभक्त परायण भारत महाराज हे भाष्य करणार आहे. या वैचारिक मेजवानीच्या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे. हा कार्यक्रम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृह जुना जालना येथे २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता होणार आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी अण्णा सावंत, एडवोकेट शिवाजी आदमाने, अफसर मिर्झा ज्ञानोबा वरवट्टे, प्राध्यापक विजयकुमार कुमठेकर, अध्यापक मारुती तेगमपुरे, प्राध्यापक राज्यक्रांती वळसे, सय्यद बिस्मिल्ला,वैशाली सरदार, वनिता आठवले, प्रदीप घाटे शाही, एडवोकेट अनिल मिसाळ, हे करत आहे

# कबड्डी स्पर्धेसाठी निवड चाचणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य कुमार व कुमारी गट (मुले,मुली) च्या स्पर्धा डिसेंबर मधे घेण्याचे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने निश्चित केले आहे . या स्पर्धे साठी जालना जिल्ह्याचा कबड्डी संघ मुले व मुली संघ निवडण्यासाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणीसाठी दिनांक:०१/०१/२००५ त्यानंतर जन्मलेले खेळाडू असावे असा निकष पूर्ण करणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेमध्ये सहभाग घेता येईल. स्पर्धेसाठी आवश्यक आधार कार्ड, जन्माचा दाखला (शाळेचा दाखला) .याशिवाय खेळाडूंना स्पर्धेमध्ये भाग घेता येणार नाही. तरी सर्व संघाच्या व्यवस्थापकांनी आपल्या संघाची नोंदणी दिनांक : २८/११/२०२४ पर्यंत संजय येळवंते:९४२१६ ५४२१६, राहुल वाहूळे :९८२३५ ५५८०२, बाबासाहेब मंडाळे ९८२३६ ६१८६१, रविंद्र ढगे ९३२५२ ३९९९९ यांच्याकडे करावी ही स्पर्धा दिनांक : २९ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद शाळा, पिरपिंपळगाव राजूर रोड, तालुका जालना येथे सुरु होणार आहे. आपले संघ त्वरित वरील व्यक्तींकडे नोंद करावे. उशीरा झालेल्या संघाचा विचार केला जाणार नाही . याची नोंद संघ व्यवस्थापकांनी घेऊन वेळेवर नोंद करून सहकार्य स्पर्धेसाठी मुला मुलींच्या संघासाठी २०० रुपये नोंदणी फी आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. असे आव्हान कबड्डी असोसिएशन सचिव नंदकिशोर खर्डेकर, डॉ देवेश पाथ्रीकर, अशोक हजारे, माधवी काळे, राहुल वाहुळे, रामदास निहाळ यांना केले आहे.

# शहर जिल्हा कॉंग्रेसच्या वतीने सावित्रीबाई पगारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**जालना । प्रतिनिधी -** जालना नगर परिषदेच्या माजी उपनगराध्यक्ष तथा कॉंग्रेस पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्या जनसामान्याच्या प्रेरणास्थान आंबेडकर चळवळ गतिमान करणाऱ्या श्रीमती सावित्रीबाई पगारे यांच्या निधनामुळे शहरातील फुले, शाहू , आंबेडकर विचारांची मोठी हानी झाली असल्याचे जालना शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख मेहमूद यांनी स्व. सावित्रीबाई पगारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करताना आपल्या भावना व्यक्त केल्या .



जालना शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी मंमादेवी स्टेशन रोड पक्ष कार्यालयात दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ सोमवार रोजी स्व. सावित्रीबाई पगारे यांना श्रद्धांजली अर्पित करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय श्रीमती पगारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करण्यात आली बैठकीत पुढे बोलताना शेख मेहमूद म्हणाले की स्व.श्रीमती सावित्रीबाई पगारे यांनी आपले संपूर्ण जीवन गोर, गरीब , झोपडपट्टी आणि कष्टकरी जनतेच्या सेवेमध्ये अर्पित करताना फुले शाहू आंबेडकर या समतेच्या विचारांचा कधी विसर पडू दिला नाही नगरसेवक आणि उपनगराध्यक्ष पदावर काम करीत असताना झोपडपट्टी आणि गरिबांच्या वस्त्यांमध्ये विकास कामे घडून आणण्यासाठी सातत्याने संघर्ष केला होता जनसेवा आणि समतेचे विचार आपल्या जीवनाचा उद्देश ठेवून त्यांनी शहरांमध्ये कॉंग्रेस पक्षाला बळकट्टी दिली आहे , कॉंग्रेस पक्ष त्यांच्या कार्याला कधी विसरू शकणार नाही असे भावपूर्ण उदगार शेख मेहमूद यांनी काढले या बैठकीत अब्दुल बासेद कुरेशी, मंजुताई यादव, सुरेखा शिंदे, बाबासाहेब सोनवणे, वीरेंद्र कुमार रत्नपारखी, जावेद अली, गणेश चांदोडे, डॉ. सुनील सोनवणे, रवी धामुने, माणिकचंद चव्हाण, शेख शफीक, वसीम कादरी , भीमा छडीदार , रोहित मस्के, आनंद कदम, शेख फिरोज आदि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते बैठकीचे सूत्रसंचालन बाबासाहेब सोनवणे यांनी केले.

# अन्वा येथे जेईएस महाविद्यालयाचे हेरिटेज वॉक संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जगभरातील संस्कृती आणि वारसाचे संवर्धन करण्यासाठी दिनांक १९ ते २५ नोव्हेंबर दरम्यान जागतिक वारसा सप्ताह साजरा केला जातो. यनिमित्त सहाय्यक संचालक पुरातत्त्व छत्रपती संभाजीनगर विभाग व जे. ई. एस. महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने महादेव मंदिर, अन्वा येथे हेरिटेज वॉक आयोजन करण्यात आले .

जागतिक वारसा सप्ताहाअंतर्गत २२ नोव्हेंबरला भोकरदन तालुक्यातील अन्वा येथील महादेव मंदिर येथे हेरिटेज वॉक आयोजित करण्यात आला.

सहायक संचालक पुरातत्व विभाग छत्रपती संभाजी नगर व जे. ई. एस. महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने हा हेरिटेज वॉक आयोजित करण्यात आला .जेईएस महाविद्यालयातील वाणिज्य इतिहास विभाग प्रमुख प्रोफेसर विलास जाधव यांनी यावेळी सदरील मंदिराचा इतिहास,मंदिर स्थापत्य, मंदिरावरील शिल्प व एकंदरीत जागतिक वारसा सप्ताह या संदर्भात मार्गदर्शन केले.


याप्रसंगी डॉ. यास्मिन शेख, डॉ. म्हातारबा हिंगे, प्रा. सतीश लोंढे, राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. सविता मुंढे, प्रा. रामचंद्र पालवे तसेच पुरातत्व विभागाचे कृष्णा सोनावणे व सुनील इंगळे तसेच विद्यार्थी,नागरिक उपस्थित होते.



# वरुड (बु.) आरोग्य केंद्रात रेबीज लसीचा तुटवडा

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील वरुड (बु.) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबीज लस उपलब्ध नसल्याने रुग्णांची मोठी हेळसांड होत आहे. लस घेण्यासाठी जाफराबाद येथील ग्रामीण रुग्णालयात जावे लागत असल्याने रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय, येथील आरोग्य केंद्रात सर्वसामान्य जनतेला आरोग्य विषयक सोयी-सुविधा मिळत नसल्याने रुग्णांना खासगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागत आहेत. त्यामुळे मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या गरीब कुटुंबांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सोयीस्कर दुर्लक्षामुळे होणारे रुग्णांचे हाल होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे आता तरी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन स्थानिक कर्मचाऱ्यांना सूचना करत, रेबीज लसीसह इतर औषधी व आरोग्यसेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

सर्वसामान्य गोरगरीब जनतेला मोफत आरोग्य विषयक सोयी-सुविधा मिळाव्यात हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. आजाराचे निदान होऊन आरोग्य अबाधित राहावे, हा सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून जिल्हा परिषद केंद्राअंतर्गत पंधरा गावांचा समावेश असताना देखील येथे रेबीज लसीचा तुटवडा भासत आहे. खासगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात हीच बोंब असून, रुग्णांना रेबीजची लस घेण्यासाठी जाफ्राबाद येथील ग्रामीण रुग्णालयात जावे लागत असल्याने हे आरोग्य केंद्र केवळ शोभेची वस्तू बनले आहे. गोर-गरिबांना आर्थिक भुर्दड व आरोग्य विभागाच्या वतीने कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून आरोग्य केंद्राशिवाय, रेबीज लससाठी ही खासगी भव्य इमारत उभारण्यात आली आहे. या आरोग्य हॉस्पिटल किंवा मेडिकलला रेबीज लस मिळत नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. इतर आजारांच्या औषधांचा आरोग्य केंद्रात तुटवडा असल्याने बाहेरुन विकतची औषधी आणावी लागत असल्याचे यावेळी रुग्णांनी सांगितले. रुग्णांना सोसावा लागणारा आर्थिक भुर्दंड व सुविधांअभावी होणारे हाल पाहता, आरोग्य विभागाच्या वतीने रेबीज लस व औषधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.



जालना विधानसभा मतदारसंघांमध्ये अर्जुनराव खोतकर आमदार म्हणून प्रचंड मतांनी निवडून आल्याबद्दल शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शहर प्रमुख विष्णू पाचफुले मेघराज चौधरी अमोल राऊत रमेश चांदर अनिल खंडाळे यांनी त्यांचा सत्कार केला.

# जालना शहर महापालिकेवर प्रशासकीय मंडळ नियुक्त करावे

## ॲड. महेश धन्नावत यांची राज्यपाल व मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगर पालिकेवर प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्यात यावे, अशी मागणी ॲड. महेश धन्नावत यांनी केली आहे. यासंदर्भात जालना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व राज्यपाल यांना निवेदन ॲडद्य धन्नावत यांनी दिले आहे.

दिलेल्या निवेदनात आहे की, जालना नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झालेले आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थेचा म्हणजेच पुर्वीच्या नगर पालिकेच्या नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्याने प्रशासक म्हणून प्रभारी आयुक्त हे काम पाहत आहेत. मात्र, जनतेतून कोणीही प्रतिनिधी नसल्याने नागरी सुविधाअभावी जनतेचे हाल होत आहेत. त्यांना त्यांची समस्या मांडण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. जालना कृषि उत्पन्न बाजार समिती सुद्धा जालना महानगरपालिकेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था आहे. संचालक मंडळाचा कार्यकाळ संपल्याने तेथे प्रशासक मंडळ आहे, त्याचप्रमाणे जालना म हानगरपालिकेवर प्रशासकीय मंडळ नियुक्त करावे; ज्यामध्ये जनतेचे अनुभवी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, वकील, डॉक्टर्स, व्यापारी यांचा समावेश करावा जे महानगरपालिकेचा कारभार चालविण्यास मदत करतील. असे केल्यास



जनतेला या प्रतिनिधी म्हणजे प्रशासकीय मंडळ सदस्यांच्या माध्यमातून आपल्या समस्या मांडता येतील. जालना म हानगरपालिकेची निवडणूक होत नाही, तोपर्यंत प्रशासकीय मंडळ नियुक्त करावे, अशी मागणी ॲड. महेश धन्नावत यांनी केली आहे.

# भारताचे संविधाने सर्वोच्च राष्ट्रीय ग्रंथ

आपला देश ज्या कायद्यानुसार चालतो, त्या कायद्याची संहिता असणारे ग्रंथ म्हणजे भारताचे संविधान होय. म्हणून त्या ग्रंथाला सर्वोच्च राष्ट्रीय ग्रंथ संबोधणे संयुक्तीक ठरेल, असे मला वाटते.

भारताचे संविधानाचा सरनामा अर्थात उद्देशिका समजून घेण्याचा प्रयत्न केला तर असे लक्षात येते की, या राष्ट्रीय ग्रंथात मानवीय विचारांची सांगड घातली आहे. असे प्रत्येक कलमाचे अवलोकन केले असता लक्षात येते. म्हणून या ग्रंथाला मानवीय विचारांची संहिता म्हणून स्विकारायला हवी. ती संहिता सृष्टीतील सर्व मानवास मानवीय जीवन सुकर होण्यासाठी मार्गदर्शक आहे. करिता या संहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून सृष्टीतील कोणत्याही व्यक्तीमध्ये जात, धर्म, लिंग, वंश, प्रांत, भाषा यावरून भेदभाव केला जाणार नाही. वेगवेगळ्या देशात त्यांनी स्विकारल्याप्रमाणे त्या त्या देशातील संविधानानुसार कायदे कानून उपलब्ध असले, तरी भारताचे संविधानातील म ानवतावादाच्या उत्थानासाठी अंतर्भूत असलेला सारांश मात्र जगातील मानवाच्या मेंदूत, मनात बिंबविण्याची नितांत आवश्यकता आहे. ज्यामुळे केवळ भारतातीलच नव्हे! तर जगातील मानवीय समाज समृद्ध होईल. परिणामी जगात शांतता प्रस्थापित होईल.

द्वितीय महायुद्धाच्या सम ाप्तीनंतर भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न अग्रक्रमाने पुढे आला. त्यामुळे यासाठी स्थापन करण्यात आलेले त्रिसदस्यीय कॅबिनेट मिशन यांनी ११ मार्च १९४६ ला सत्ता हस्तांतरणाची योजना जाहीर केली. ज्यानुसार भारताचे संविधान निर्मितीसाठी संविधान सभा स्थापन करण्यात यावी, असे सूचित करण्यात आले होते. या उद्देश पूर्तीसाठी भारताचे संविधान सभा स्थापन करण्यात आली. भारताच्या संविधान सभेची पहिली बैठक सोमवार दिनांक ९ डिसेंबर १९४६ रोजी सकाळी ११ वाजता, 'संविधान सभागृह, नवी दिल्ली' येथे भरली होती. त्याच दिवशी भारताचे संविधान निर्मितीच्या कार्याला सुरुवात करण्यात आली. भारताचे संविधान सभेने १० डिसेंबर १९४६ ला अध्यक्षांच्या नियुक्ती संबधी नियम पारीत केले. त्यानुसार ११ डिसेंबर १९४६ ला डॉ. राजेंद्र प्रसाद यांची भारताचे संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

२९ आगस्ट १९४७ ला सत्यनारायण सिन्हा यांनी मांडलेल्या ठरावाला एकम ताने मंजूरी देऊन सात सदस्यीय मसुदा समिति



गठीत करण्यात आली. त्यात अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अयंगार, डॉ. बी. आर. आंबेडकर, के. एम. मुन्शी, सैय्यद मोहम्मद सादुल्ला, बी. एल. मित्तल, डी. पी. खेतान यांची मसुदा समि तीचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. ३० आगस्ट १९४७ ला मसुदा समितीच्या बैठकीत डॉ. आंबेडकरांना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. या मसुदा समितीची पहिली बैठक २७ ऑक्टोबर १९४७ ला घेण्यात आली. मसुदा समितीने भारत एक सार्वभौम लोकसत्ताक गणराज्य असेल असे सुचविले होते.

४ नोव्हेंबर १९४८ ला भारताचे संविधानाचा मसुदा संविधान सभेत सादर केल्यानंतर प्रथम वाचन करण्यात आले. तर १५ नोव्हेंबर १९४८ ला द्वितीय वाचनास प्रारंभ होऊन त्यात प्रत्येक अनुच्छेदावर क्रमवार चर्चा करण्यात आल्याने ही चर्चा १७ ऑक्टोबर १९४९ पर्यंत चालली. त्यानंतर तृतीय वाचनाकरिता १४ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभा भरविण्यात आली ती २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत म्हणजे भारताचे संविधान स्विकृत होईपर्यंत चालली. म्हणून २६ नोव्हेंबरला भारताचे संविधान स्वीकृती दिवस म्हणून ओळखल्या जातो. या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन आपण हा दिवस राष्ट्रीय सणाप्रमाणे साजरा केला पाहिजे.

४ नोव्हेंबर १९४८ ला भारताचे संविधान सभेला मसुदा सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्गदर्शन करीत असताना खरेच, संविधाना अंतर्गत काही चुकीच्या गोष्टी घडल्या तर त्यास संविधान जबाबदार नसेल, माणसाची दुष्टता जबाबदार असेल. याची जाणीव ठेवून निरपेक्ष वृत्तीने या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने १० नोव्हेंबर २०२४ ला सदरील विधानाच्या ७६ व्या वर्धापनदिनानिमित्त या अनुषंगाने वैचारीक प्रबोधनात्म क साप्ताहिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या संविधानातील पहिले कलम ज्यात 'इंडिया अर्थात भारत, हा राज्याचा संघ असेल.' असे स्पष्ट म्हटले असताना समाज जीवनात काही लोक, नेते, कार्यकर्ते हिदुस्तान असा उल्लेख करतात. हे भारताचे संविधान यातील तरतूदीचे उल्लंघ नाही काय? तसेच कलम ३९३ प्रम ाणे या संविधानास भारताचे संविधान ढहश उेपीींळीींीेप ेष खपवळर भारत का संविधान असे म्हणावे, असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे. अर्थात या संविधानावर बोलत असताना भारत या शब्दापासून संविधान वेगळे करून संबोधन केल्यास ते संबोधन अर्थहीन होईल. तरीही समाज जीवनात अनेक व्यक्ती, पक्ष, संस्था, संघटना सुद्धा भारताचे संविधान याचा केवळ संविधान असा एकेरी उल्लेख करतात. काही जण संविधान प्रतिष्ठान, संविधान रॅली, संविधान मंच, संविधान बचाव इत्यादी इत्यादी असा बचावात्मक पवित्रा घेत आहेत. यात बामसेफ सारख्या अग्रगण्य सामाजिक संघटनेचा एक गट सुद्धा अग्रेसर आहे. त्यांनी तर आपल्या अभियानाचे नांवच बीएसफोर अर्थात भारतीय संविधान, सन्मान, सुरक्षा व संवर्धन असे ठेवले आहे. ज्यात भारताचे संविधान ही कलम ३९३ प्रमाणे विभक्त न होणारी शब्दावली असेल तर मग ती शब्दावली विभक्त करणारे भारताचे संविधान याच्या समर्थनार्थ सन्मान, सुरक्षा व संवर्धनासाठी काय अभियान चालवीत असतील? याची शहानिशा करूनच जनतेने समर्थन दिले पाहिजे. या कलमानुसार तसे एकेरी उल्लेख करण्याची सुट देण्यात आलेली नाही. तरी भारताचे संविधान यावर प्रेम व आस्था असणाऱ्यांनी जाणीवपूर्वक भारताचे संविधान असाच उल्लेख करावा. अशी माझी आग्रही भूमिका आहे. सत्याला सत्य म्हणून स्विकारून असत्याला नाकारले पाहिजे, जेणेकरून आदर्श महापुरुषांच्या क्रांतिकारक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाता येईल. याचे भान ठेवून मार्गक्रमण करावे.

भारताचे संविधान यातील उद्देशिकेची सुरूवातच आम्ही, भारताचे लोक अशी करण्यात आली आहे. ज्यात सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रदान करून विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य बहाल करून दर्जा व संधीची सम ानता याची हमी देण्यात आली आहे. असे महत्वपूर्ण भारताचे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ ला अंगीकृत व अधिनियम ीत करून स्वतःप्रत अर्पण करण्यात आले आहे. जय भीम! जय पिपल्स व्हाईस!! जय भारताचे संविधान!!!

**लेखक : बी. बी. मेश्राम,**
**नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना),**
**संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल,**
**छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.**

# संविधान; भारताचा राष्ट्रीय ग्रंथ

२६ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७५ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांन एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान.

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत.

ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा.

२६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुम ारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून सम ावेश करण्यात आला होता. घटना समि तीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला.

संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम म ुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्याम ुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठया उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

**श्याम बसप्पा ठाणेदार**

# भारतीय संविधान दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संविधान दिनानिमि त्त दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना या कार्यालय यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहामध्ये सकाळी ११.00 वाजता 'भारताचे संविधान' या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणुन प्रा. डॉ. विजयकुमार कुमठेकर, मत्स्योदरी महाविद्यालय, जालना तसेच इतर मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याबाबतचे आवाहन सहायक आयुक्त, सम ाजकल्याण, जालना अनंत कदम यांनी केले आहे.

२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करुन, २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. संविधानाचे महत्व अनेक स्तरांवर असुन भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ति, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, तसेच दर्जा व संधीची सम ानता प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा विचार केलेला आहे. संविधान हे एक जीवंत दस्तऐवज आहे जे देशाच्या विकासात आणि नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत महत्वपूर्ण भूमिका बजावते.

भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता, तसेच संविधानाची मुल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरिक यांच्यापर्यंत पोहचावीत यासाठी राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक / बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ स्वयं अर्थसहाय्यित शाळा/ आश्रमशाळा व वसतिगृहे तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृतमहोत्सवी वर्षात घर घर संविधान हा उपक्रम साजरा करण्यात येणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.